## PRAHLADRAI DALMIA LIONS COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS

**Sunder Nagar, S. V. Road, Malad (W) Mumbai - 400 064**

**ISO 9001:2015 Certified**


# NOTICE

## JUNIOR COLLEGE

**विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई.**

जवाहर बालभवन, तळमजला नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.

दूरध्वनी क्र.०२२/२३६३००८१ ई-मेल-dd.mumbai@mahedu.gov.in, dydemumbai@yahoo.com

क्र.शिउसं/माध्य-४/संकिर्ण/२०२०/ ९८१०-१५ दिनांक :- 23 OCT 2020

प्रति,

१) शिक्षणाधिकारी,बृहन्मुंबई (म.न.पा)
२) शिक्षण निरीक्षक,
पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग, मुंबई
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),
जि. प. ठाणे/पालघर/रायगड
३) शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी (म.न.पा.),
नवी मुंबई/ ठाणे

**विषय :- शिक्षकांना विनाकारण शाळेत बोलावणे व परीक्षा आयोजनाबाबत..**

संदर्भ :- १) सुभाष किसन मोरे, कार्याध्यक्ष, शिक्षक भारती, महाराष्ट्र राज्य यांचे दि.२२.०९.२०२० व दि.१२.१०.२०२० रोजीचे निवेदन

२. शालेय शिक्षण विभाग यांचे दि.२४.०६.२०२० रोजीचे शासन परिपत्रक

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये सुभाष किसन मोरे, कार्याध्यक्ष, शिक्षक भारती यांनी शासन निर्णय दि.२४.०६.२०२० नूसार शिक्षकांना वर्क फ्रॉम होमची सवलत दिलेली असतांनाही अनेक शाळा / महाविद्यालय केवळ सहीसाठी शाळेत बोलवीत असल्याबाबत याकार्यालयास निवेदन दिले आहे.

तसेच कोरानाच्या काळात शाळा बंद असल्यातरी शिक्षक ऑनलाईन शिकवीत असून अनेक शाळा आठवडयातून एकदा – दोनदा शाळेत केवळ सहीसाठी बोलावीत आहेत. हजर न झाल्यास पगार कपात केली जात आहे. अनेक कर्मचारी ठाणे, नवी मुंबई, रायगड व पालघर जिल्हयात राहत असल्याने व लोकल ट्रेन बंद असल्याने खाजगी वाहने करुन शाळेत येत आहेत. शाळेच्या हट्टापायी शिक्षकांना तीन ते चार हजार रुपये खर्च करुन शाळेत यावे लागत आहे. अनेक शिक्षकांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे. तर मुंबईत व राज्यात काही शिक्षकांचा मृत्युदेखिल झाला आहे. तसेच प्रथम चाचणी व सहामाही परीक्षा आयोजनाबाबत शिक्षण विभागाने कोणतेही आदेश दिलेले नसतांना काही शाळांनी परीक्षा आयोजनाबाबत सुचना केल्या आहेत असे निवेदनात नमूद केले आहे.

१. ऑनलाईन शिक्षणाव्यतिरिक्त कोणतेही परीक्षा घेण्याबाबतचे शासनाचे स्पष्ट निर्देश नाहीत.
२. शिक्षक / कर्मचारी यांचे ऑनलाईन कर्तव्यकाळ ग्रहीत धरुन कोणत्याही कर्मचा-याचे वेतन रोखू नये.

सबब याप्रकरणी शालेय शिक्षण विभाग यांचे दि.२४.०६.२०२० रोजीच्या शासन परिपत्रकात दिलेल्या तरतुदींचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणेसाठी तसेच या परिपत्रकाचे उल्लंघन झाल्यास संबंधित मुख्याध्यापकावर जबाबदारी निश्चित करावी लागेल याबाबतचे निर्देश आपल्या अधिनस्त सर्व शाळा / महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

( अनिल साबळे )
विभागीय शिक्षण उपसंचालक
मुंबई विभाग, मुंबई

**प्रत माहितीस्तव :-**

सुभाष किसन मोरे, कार्याध्यक्ष शिक्षक भारती,
पोयबावडी म्यु.प्रा.स्कुल, केईएम जवळ, कामगार मैदान,परळ, मुंबई-१२

E:\\विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय.doc

Scanned with CamScanner

As per above GR our SYJC Evaluation 2020 which is going to start from tomorrow is postponed till further notice. From tomorrow onwards regular online lectures will be conducted as per timetable.

| | | |
|---|---|---|
| **Anil Bagade** | **Kiran Mishra** | **Dr. Kiran Mane** |
| **Incharge** | **Incharge** | **I/C Principal** |

**DI/N-STD/Gen/00**